सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६७ | शुक्रवार, दि. १९ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४८०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३६२००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११२५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४७०/-
भाव प्रती १० ग्राम

**आजचे अभीष्टचिंतन**





**डॉ. विक्रांत पाटील**
पद्मश्री हॉस्पीटल, अमळनेर



**श्री. विवेक बिऱ्हाडे**
वीज वितरण कंपनी



**श्री. राजेंद्र देशमुख**
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# पाणी हा हक्क आहे, भीक नाही !

## या ज्वलंत समस्येसाठी विरोधक काढणार २२ जूनला भव्य मोर्चा

### दोन दिवसांआड पाणी देण्याचे आश्वासन; पण प्रत्यक्षात ८-८ दिवस पाणीपुरवठाच नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**






**अमळनेर : येथील पालिकेने पाणीपुरवठा नियोजनाबाबत नियोजनाचा पार बोजवारा उडवला आहे. सत्ताधाऱ्यांचे अंतर्गत राजकारण व दूरदृष्टीचा अभाव यामुळे अमळनेरकरांसमोर पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट उभे राहिले आहे. पालिका नागरिकांकडून भरमसाठ पाणीपट्टी घेऊनही पाणी पाजत नसल्याचे चित्र दिसते आहे, नागरिकांना पाण्यासाठी अक्षरशः वणवण भटकंती करावी लागत आहे. त्यात पालिका निवडणुकीवेळी सत्ताधाऱ्यांनी दोन दिवसांआड पाणी देण्याचे आश्वासन हवेतच राहिले आहे. वास्तविक पाहता शहरातील जनतेला पाणी देण्याची जबाबदारी पालिकेचीच आहे. पाणी हा नागरीकांचा हक्क आहे, पालीका त्यांना पाणी देते म्हणजे भीक देत नाही. हल्ली शहरात सर्वात ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे तो म्हणजे पाणी पुरवठा सुरळीत आणि नियमित करावा यासाठी शहर विकास आघाडीतर्फे २२ जून रोजी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते पालिकेपर्यंत मोर्चा निघणार आहे. सदर मोर्चात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही 'शविआ'ने केले आहे.**

शहर विकास आघाडीने याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की अमळनेरकरांपुढे सध्या सर्वांत मोठा आणि ज्वलंत प्रश्न एकच आहे तो म्हणजे पाणी. पालिका निवडणुकीवेळी सत्ताधाऱ्यांनी दोन दिवसांआड पाणी देण्याचे आश्वासन शहरातील नागरिकांना दिले होते. त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले आहे. आठ-आठ दिवस पाणीपुरवठाच होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. खरे म्हणजे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आता जनतेच्या जगण्या-मरण्याचा झाला आहे. मात्र, सद्यःस्थितीत पाणीप्रश्नी नागरिकांचा विश्वासघात झाला आहे. नागरिकांनी मोठ्या विश्वासाने ज्यांना सत्ता दिली त्या सत्ताधाऱ्यांनी जनतेलाच तहानलेले ठेवले आहे. पाणी समस्यमुळे संपूर्ण शहरच उद्ध्वस्त अवस्थेत दिसत आहे. शहरात सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य झाल्याने अनेक अपघात होत आहे. भूयारी गटारींच्या खोदकामामुळे शहराची दुर्दशा झाली आहे. स्वच्छतेचाही बोजवारा उडाला आहे. त्यामुळे शहर रोगांच्या विळख्यात सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी गटारी तुंबल्या आहेत. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी व अस्वच्छता निर्माण झाली आहे. जून महिना आता संपण्याच्या मार्गावर असताना शहरात पावसाळ्यापूर्वीची साफसफाईचे नियोजन झालेले नाही. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पालिकेने नियमित नगरसेवकांच्या व पालिकेतील अधिकाऱ्यांच्या बैठका (मिटींग) घेणे आवश्यक असते. मात्र बैठक होत नसल्याने नागरिकांच्या तक्रारींकडे पालिकेकडून दुर्लक्ष होत आहे. नागरिक कमालीचे हताश झाले आहेत. त्यात अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणाचाही फारसा धाक राहिलेला नाही. त्यामुळे त्यांच्यापैकी अनेकजण केवळ जबाबदाऱ्या झटकण्यात धन्यता मानत आहेत. पदाधिकारी व अधिकारी मनमानीपणे वागत असून ते केवळ जबाबदारी झटकण्यातच धन्यता मानत आहेत. पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा मोठा अभाव आहे. शहर विकासाबाबतीत मागे पडत चालले आहे.

अनेक रस्त्यांवरील अनेक पथदिवे बंद असल्याने अंधारामुळे नागरिकांचा जीव धोक्यात असल्याची स्थिती आहे. सत्ताधारी मस्त असून, जनता मात्र त्रस्त असल्याचे दिसत आहे. शहरातील नागरी सुविधांची व्यवस्था कमालीची कोलमडली आहे. हे सारे काही म्हणजे केवळ पालिका प्रशासनाचे अपयश नाही, तर ती जनतेच्या विश्वासाची आणि सनदशीर हक्काची पायमल्ली आहे. या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त नागरिकांनी हांडे व मडके घेऊन मोर्च्यात सहभागी व्हावे असे आवाहन 'शविआ' ने केले आहे.

**अमळनेरकरांना ठाम, कडक आणि अंतिम आवाहन**

**अमळनेरकरांनो, रस्त्यावर उतरा. आपल्या हक्कासाठी आवाज उठवा. नगरपरिषदेला जाब विचारल्याशिवाय थांबू नका. हा लढा पाण्यासाठी आहे. हा लढा जगण्याच्या हक्कासाठी आहे. हा लढा अमळनेरच्या सन्मानासाठी आहे. आज उठलो नाही, तर उद्या आपल्याला उभे राहायलाही जागा उरणार नाही. मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा. आता लढा देण्याची वेळ आली आहे.**





*अमळनेर - माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांना निवेदन देताना प्राचार्य बी. डी. पाटील व उमेश काटे. शेजारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी*

# चार महिन्याच्या प्रलंबीत वेतनासाठी माजी आमदार डॉ. तांबेंना साकडे!

### विजयनाना पाटील आर्मी स्कुलच्या शिक्षकांनी दिले निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील विजयनाना पाटील आर्मी स्कुल अँड ज्यूनिअर कॉलेजमधील ज्यूनिअर कॉलेज विभागाचे गेल्या चार महिन्यापासून वेतन (पगार) प्रलंबीत आहेत. 'संच मान्यते'चा सावळा गोंधळ होत असल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आर्मी स्कुलच्या शिष्टमंडळाने माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांची भेट घेत त्यांना साकडे घातले.

राज्यातील शिक्षण विभागाने एकीकडे सर्व शाळांच्या संच मान्यता ह्या 'ऑनलाईन' केल्या आहेत, तर दुसरीकडे राज्यातील सैनिकी शाळांच्या संच मान्यता मात्र अजूनही 'ऑफलाइन' अर्थात पारंपारिक पद्धतीने केल्या जात आहेत. त्यात नेमके कोणी अपडेट व्हावे याबाबत संदिग्धता आहे. त्यातच अमळनेर येथील विजयनाना पाटील आर्मी स्कूल अँड ज्युनियर कॉलेज २०२३- २४ या वर्षाची संच मान्यता पत्रकामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदे दिसत नाही. ही बाब संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतरही ही चूक जशीच्या तशी ठेवण्यात आली आहे. परिणामी या चुकीचे खापर मात्र शालेय प्रशासनावर फोडले. नेमके त्याच चुकीचे कारण पुढे करत शिक्षक व कर्मचाऱ्यांचे पगार फेब्रुवारी ते मे २०२६ पर्यंत प्रलंबीत आहेत. म्हणजे शिक्षक गेल्या चार

**पान २ वर**

# अमळनेरातील आरपीएफ अधिकाऱ्याची प्रकृती गंभीर

### उपचारासाठी मुंबईला हलविले, दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : सर्व्हिस पिस्टलमधून कपाळावर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरपीएफच्या सहाय्यक उपनिरीक्षक जयपालसिंग यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथील रेल्वे रुग्णालयात हलविण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेत त्यांच्या दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेल्याने त्यांना कायमस्वरूपी अंधत्व आल्याची माहिती समोर आली आहे.

याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, जयपालसिंग यांनी १६ जून रोजी पहाटे साडेबारा वाजण्याच्या सुमारास स्वतःच्या सर्व्हिस पिस्टलमधून डोक्याला गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. गोळी डोक्यातून आरपार गेल्याने ते गंभीर जखमी झाले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना धुळे येथे हलविण्यात आले होते. मात्र प्रकृती अधिक खालावल्याने आणि दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेल्याने त्यांना तातडीने मुंबई येथील रेल्वेच्या विशेष रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेनंतर नंदुरबार रेल्वे पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मनमाड येथील फॉरेन्सिक पथकाने रक्ताचे नमुने तसेच गोळीचे अवशेष जप्त करून तपासासाठी पाठविले आहेत. घटना घडून दोन दिवस उलटूनही अद्याप कोणतीही फिर्याद दाखल झालेली नसल्याने रेल्वे पोलिसांत गुन्हा नोंद झालेला नाही. दरम्यान, भारतीय न्यायसंहितेनुसार आत्महत्येच्या प्रयत्नासंदर्भातील पूर्वीचे कलम ३०९ रद्द झाल्याने त्या अनुषंगाने गुन्हा दाखल होण्याची शक्यता नसल्याचे समजते. या प्रकरणाची आरपीएफचे वरिष्ठ अधिकारी आणि अधीक्षक स्तरावरील अधिकारी सखोल चौकशी करत आहेत. प्राथमिक माहितीनुसार, जयपालसिंग हे काही काळापासून मानसिक तणावाखाली होते. तसेच नुकतेच निलंबनाचा कालावधी पूर्ण करून ते पुन्हा सेवेत रुजू झाले होते. या पार्श्वभूमीवरही चौकशी यंत्रणा विविध बाबींचा तपास करीत आहे.

# फाफोरे बु. येथे रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर जप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील फाफोरे बु.-बिलखेडा परिसरात अवैधरीत्या रेतीची वाहतूक करणाऱ्या रेतीने भरलेल्या ट्रॅक्टरवर महसूल विभागाच्या पथकाने कारवाई करत ट्रॅक्टर मुद्देमालासह ताब्यात घेतला. सदर कारवाईत कन्हेरे तलाठी अभिमान जाधव , योगेश पाटील, मंडळ अधिकारी हेडावे,जुनोने तलाठी गुलाबसिंग पावरा तसेच मंगरूळ कोतवाल भटू पाटील यांनी सहभाग घेतला.महसूल विभागाकडून अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले असले तरी कारवाईत सातत्य ठेवण्याची मागणी केली जात आहे. जप्त केलेले वाहन पुढील कार्यवाहीसाठी तहसील कार्यालय, अमळनेर येथे जमा करण्यात आले आहे.



*अमळनेर : रेतीने भरलेल्या जप्त केलेल्या ट्रॅक्टरसह अभिमान जाधव, योगेश पाटील, गुलाब सिंग पावरा, भटू पाटील आदी.*

# मयुरीच्या शिक्षणाला आधार; माजी सरपंच बापूराव महाजन यांची सामाजिक बांधिलकी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षणाच्या प्रवाहात कोणताही विद्यार्थी आर्थिक किंवा कौटुंबिक अडचणींमुळे मागे राहू नये, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिरूड येथील माजी सरपंच बापूराव महाजन यांनी तालुक्यातील शिरूड येथील व्ही.झेड.पाटील हायस्कूल येथे शिकणाऱ्या गरजू विद्यार्थिनी मयुरी शिरसाठ हिच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

मयुरी शिरसाठ हिला आई-वडील नसल्याने ती सध्या आपल्या मावशीकडे राहून शिक्षण घेत आहे. तिच्या परिस्थितीची जाणीव ठेवून श्री.महाजन यांनी गेल्या तीन वर्षांपासून तिच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य, वह्या, पुस्तके, गणवेश तसेच इतर लागणाऱ्या वस्तू उपलब्ध करून देत सातत्याने मदतीचा हात दिला आहे. विशेष म्हणजे मयुरीच्या दहावीपर्यंतच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली आहे.

यंदा मयुरी इयत्ता दहावीत शिक्षण घेत असून नव्या शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने श्री.महाजन यांनी प्रत्यक्ष शाळेत जाऊन तिचा उत्साह वाढवित आवश्यक शैक्षणिक साहित्य भेट दिले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अनिल सोनवणे, शिक्षकवृंद तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

शिक्षण हेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे खरे साधन असून, आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होऊ नये, अशी भावना व्यक्त करत श्री. महाजन यांनी मयुरीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या उपक्रमाचे ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापनाकडून कौतुक करण्यात आले.

सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असलेल्या श्री. महाजन यांच्या या कार्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाचे बळ मिळत असून समाजात सकारात्मक संदेश पोहोचत आहे. अशा संवेदनशील उपक्रमांमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



*अमळनेर : मयूरी शिरसाठला शैक्षणिक साहित्य देताना माजी सरपंच बापूराव महाजन, मुख्याध्यापक अनिल सोनवणे, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थ.*

## संपादकीय

# पेपरफुटीमुक्त परीक्षेसाठी

भारतातील वाढत्या पेपर लीक प्रकरणांनी परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या पार्श्वभूमीवर परीक्षा प्रणालीत तांत्रिक, संरचनात्मक आणि प्रशासकीय पातळीवर आमूलाग्र बदल करण्याची गरज अधोरेखित होत आहे.भारतामधील पेपर लीक एखादी अपघाती घटना राहिलेली नाही. ती एक संघटित गुन्हेगारी साखळी बनली आहे. याचे मुख्य कारण परीक्षा प्रणालीतील सर्वात मोठी कमकुवत कडी म्हणजे 'मानवी हस्तक्षेप.' प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून विद्यार्थ्यांच्या हातात पोहोचेपर्यंत ती प्रश्ननिर्माते, समीक्षक, भाषांतरकार, मुद्रणालय, वाहतूक व्यवस्था, जिल्हा अधिकारी, परीक्षा केंद्र आणि पर्यवेक्षक या प्रत्येक टप्प्यावर लीक होण्याची शक्यता निर्माण होते. असे वाटते, भारताची परीक्षा व्यवस्था अजूनही १९ व्या शतकात अडकलेली आहे का? परीक्षा प्रणालीचे संपूर्ण आर्किटेक्चर बदलावे लागणार आहे. आता भारताने डीजी एक्झाम मॉडेल स्वीकारण्याची वेळ आली आहे. भारताला आता 'डिजिटल परीक्षा क्रांती'ची गरज आहे. सर्वात मोठी समस्या म्हणजे तात्पुरती परीक्षा केंद्रे. दरवेळी वेगवेगळ्या शाळा आणि महाविद्यालयांना केंद्र बनवण्याऐवजी भारताने किमान १,००० कायमस्वरूपी सिक्युअर स्टँडर्ड टेस्टिंग सेंटर्स उभारणे आवश्यक आहे. या केंद्रांमध्ये २४ तास सीसीटीव्ही मॉनिटरिंग, आरएफ आणि ब्लूटूथ जॅमर्स, बायोमेट्रिक प्रवेश, सुरक्षित सर्व्हर रूम आणि शस्त्रधारी सुरक्षा असावी. या सेंटरवर वर्षभरात विविध परीक्षा घेता येतील. एकच पेपर, एकच दिवस आणि लाखो विद्यार्थी ही सर्वात मोठी कमजोरी आहे. एका लीकमुळे संपूर्ण परीक्षा धोक्यात येते. त्यामुळे बहु-सत्र परीक्षा, वेगवेगळे प्रश्न संच आणि बहु-टप्पा चाचण्या आता गरज बनली आहे. जेईई मेनमध्ये हे मॉडेल काही प्रमाणात यशस्वी ठरले आहे.पेपर लीक थांबवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे 'पेपर' ही संकल्पनाच संपवणे. भारताने कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट आणि कॉम्प्युटर अडाप्टिव्ह टेस्टिंगकडे जाणे अपरिहार्य आहे.

सीबीटीमध्ये प्रश्न एन्क्रिप्टेड स्वरूपात सुरक्षित सर्व्हरवर ठेवले जातात. प्रत्येक विद्यार्थ्याला वेगळ्या क्रमाने प्रश्न दिसतात. स्क्रीन लॉकडाऊन, स्क्रीनशॉट ब्लॉकिंग आणि एआय निगराणी, यामुळे लीकची शक्यता कमी होते. सीएटी प्रणालीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला वेगळे प्रश्न दिले जातात आणि पुढील प्रश्नाची कठीणाई मागील उत्तरांवर आधारित असते. त्यामुळे दोन विद्यार्थ्यांना एकसारखी परीक्षा मिळत नाही. अशा परिस्थितीत एखादा प्रश्न लीक झाला तरी त्याचा इतर विद्यार्थ्यांना फारसा फायदा होत नाही. जिथे पूर्ण सीबीटी तत्काळ शक्य नाही, तिथे कॉम्प्युटर असिस्टेड पेन अँड पेपर टेस्ट मॉडेल वापरता येईल. यात प्रश्नपत्रिका परीक्षेच्या काही तास आधी एन्क्रिप्टेड स्वरूपात केंद्रावर पाठवली जाईल. संयुक्त बायोमेट्रिक ऑथेंटिकेशननंतर सीसीटीव्हीखाली प्रिंटिंग होईल आणि ओव्हरनाईट स्टोअरेज टाळले जाईल. यामुळे ट्रान्स्पोर्टेशन लीक चेन संपुष्टात येऊ शकते. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रश्नपत्रिका कोणी पाहिली, कोणी डाऊनलोड केली आणि कोणत्या वेळी ॲक्सेस झाला याची इम्युटेबल ऑडिट ट्रायल तयार करता येऊ शकते. एआयआधारित मॉनिटरिंगद्वारे संशयास्पद स्कोअर पॅटर्न, एकाच केंद्रातील असामान्य निकाल, उत्तरांची साम्ये, चेहऱ्याच्या हालचाली, डोळ्यांची दिशा आणि आवाज यांचे रिअल टाईम विश्लेषण करता येऊ शकते. कोटा, दिल्ली आणि हैदराबादमधील कोचिंग उद्योग आता हजारो कोटींची समांतर अर्थव्यवस्था बनला आहे. काही संस्थांना प्रश्न आधीच कसे कळतात, हा प्रश्न गंभीर आहे.चीनची 'गावको' परीक्षा अभ्यासण्यासारखी आहे.


जगातील सर्वात कठीण आणि सर्वात मोठ्या प्रवेश परीक्षांपैकी एक मानली जाणारी 'गावको' परीक्षा दरवर्षी कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवते. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणावर परीक्षा घेऊनही चीनमध्ये भारतासारखी सातत्याने पेपर लीक संकटे क्वचित दिसतात. यामागील कारणे केवळ कठोर शिक्षा नसून संपूर्ण परीक्षा संरचनेतील मूलभूत फरक आहेत. भारतामध्ये नीट परीक्षा संपूर्ण देशासाठी एकाच प्रश्नपत्रिकेवर आधारित असते. त्यामुळे पेपर लीक झाला तरी त्याचे आर्थिक मूल्य प्रचंड वाढते. उलट चीनमध्ये 'गावको' पूर्णपणे केंद्रीकृत एकसंध पेपर प्रणालीवर चालत नाही. अनेक प्रांत स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार करतात किंवा प्रादेशिक व्हेरिएशन वापरतात. त्यामुळे एखाद्या भागात सुरक्षा भेदली तरी संपूर्ण देशावर त्याचा परिणाम होत नाही. चीनमध्ये प्रश्नपत्रिकेची जबाबदारी सुरुवातीपासून शेवटपर्यंत सरकारी नियंत्रणाखाली असते. मुद्रण, वाहतूक आणि वितरण प्रक्रियेत खासगी हस्तक्षेप अत्यंत मर्यादित असतो. प्रश्नपत्रिका वाहतुकीसाठी पोलिस एस्कॉर्ट, जीपीएस ट्रॅकिंग, सीलबंद वाहने आणि सतत निगराणी यांचा वापर केला जातो. भारतात मात्र अनेकवेळा मुद्रण आणि लॉजिस्टिक प्रक्रिया बाह्य विक्रेत्यांवर अवलंबून असल्याने सुरक्षा साखळी अधिक गुंतागुंतीची आणि असुरक्षित बनते. चीनमध्ये परीक्षा ही केवळ कोचिंगकेंद्रित प्रक्रिया नाही. शालेय शिक्षण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम यांच्याशी 'गावको' अधिक जवळून जोडलेली आहे. भारतात मात्र नीट-जेईई परीक्षांभोवती अब्जावधी रुपयांचा कोचिंग उद्योग निर्माण झाला आहे. या उद्योगाला परीक्षा परिणामांमध्ये थेट आर्थिक स्वार्थ जोडला गेल्याने प्रणालीवर सतत दबाव निर्माण होतो. मानसिक दबावाच्या दृष्टीनेही दोन्ही देशांमध्ये फरक दिसतो. चीनमध्ये 'गावको' पुन्हा देता येते, त्यामुळे एकच संधी अशी मानसिकता तुलनेने कमी असते. भारतात जेईई ॲडव्हान्ससाठी मर्यादित प्रयत्न आणि नीटसाठी वर्षातून एकदाच परीक्षा असल्याने विद्यार्थ्यांमध्ये 'करा किंवा मरा' स्वरूपाचा ताण असतो. हा ताणच अनेकदा शॉर्टकट संस्कृतीला खतपाणी घालतो.'गावको' मध्ये अनेक विषयांमध्ये निबंधात्मक आणि स्पष्टीकरणात्मक उत्तरांचा समावेश असतो. त्यामुळे संपूर्ण पेपर काही मिनिटांत फोटो काढून व्हॉट्सॲपवर पसरवणे तुलनेने कठीण ठरते. नीट, जेईई मुख्यतः बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित असल्याने प्रश्नपत्रिका डिजिटल माध्यमातून वेगाने प्रसारित करणे अधिक सोपे होते. चीनमध्ये परीक्षा भ्रष्टाचार हा केवळ शैक्षणिक गुन्हा मानला जात नाही; तो राज्य व्यवस्थेवरील हल्ला मानला जातो. त्यामुळे चौकशी, शिक्षा आणि कारवाई अत्यंत वेगाने होते. भारतात मात्र अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहतात. आरोपी सहज जामीन मिळवतात आणि त्यामुळे प्रतिबंधात्मक संदेश कमकुवत पडतो. महत्त्वाचे म्हणजे, चीनची 'गावको' प्रणाली ७० वर्षांहून अधिक काळ विकसित होत आली आहे. भारताने चीनची हुबेहूब नक्कल करण्याची गरज नाही. मात्र, सुरक्षा साखळीचे सरकारी नियंत्रण, बहु-प्रश्नपत्रिका मॉडेल, तंत्रज्ञानाधारित निगराणी, कठोर कायदेशीर कारवाई आणि परीक्षा व्यवस्थेतील संस्थात्मक शिस्त याबाबी भारतासाठी महत्त्वाच्या शिकवणी ठरू शकतात.

# संध्याकाळी ६.३० नंतर तोंड बंद ठेवा!



## अक्षय कुमारचा फिटनेस मंत्र खरेच फायदेशीर आहे का? तज्ज्ञांनी सांगितले सत्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अभिनेता अक्षय कुमार जितका अभिनयासाठी ओळखला जातो तितकाच त्याच्या फिटनेससाठी ओळखला जातो. भूत बंगला फेम अभिनेता अक्षय कुमारने नुकतेच आरोग्यासाठी फायदेशीर टिप्स चाहत्यांसाठी सांगितली. त्याने त्याच्या 'व्हील ऑफ फॉर्च्यून, इंडिया' या गेम शोमध्ये सांगितले की, "चांगले आयुष्य जगण्याचा सर्वात चांगला एकच फॉर्म्युला आहे. मला अनेक लोक विचारतात की, कोणता व्यायाम केला पाहिजे मी नेहमी सांगतो एकच व्यायाम करा जो सायंकाळी ६.३० नंतर करू नये तो म्हणजे तोंड बंद करा म्हणजेच सायंकाळी ६.३० नंतर काहीही खाऊ नका. आपल्या शास्त्रामध्ये सांगितले आहे की, सुर्यास्तानंतर घरातील चूल बंद करा कारण सायंकाळनंतर आपल्या पोटातील अग्नी (पचनसंस्था) शांत होतो म्हणजेच पचनक्रिया मंदावते." मात्र, सूर्यास्तानंतर जेवण पूर्णपणे टाळणे हा नियम प्रत्येकासाठी योग्य आहे का? यावर तज्ज्ञांचे मत जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

अक्षय कुमारच्या ६.३० नंतर काहीही न खाण्याचा नियमाबाबत तज्ज्ञ सांगतात की,सायंकाळी ६.३० नंतर जेवण न घेण्याच्या सल्ल्यामध्ये काही तथ्य आहे, पण त्यासाठी संदर्भाची गरज आहे. आपले शरीर नैसर्गिक चक्रानुसार काम करते त्यामुळे आपली पचनसंस्था दिवसभरात चांगल्या प्रकारे काम करते. उशीरा जेवण करणे विशेषतः पचण्यास जड आणि तेलकट आहार घेतल्यामुळे अपचन होऊ शकते, शांत झोप लागत नाही आणि कालांतराने वजन वाढते. पण सायंकाळी ६:३० ची कठोर वेळ निश्चित करणे प्रत्येकासाठी व्यावहारिक किंवा आवश्यक नाही.आपले शरीर सुर्यास्तनंतर कार्य करणे बंद करत नाही. पण जेव्हा तुम्ही झोपता तेव्हा तुमचे शेवटचे जेवण पचण्यास किती जड होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. आदर्शपणे, तुमच्या रात्रीचे जेवण आणि झोप यामध्ये २-३ तासांचे अतंर असणे आवश्यक आहे. जर कोणी १० वाजता झोपत असेल तर ७-३० वाजेपर्यंत जेवण करावे. मात्र जे उशिरा जेवतात त्यांनी झोपेच्या वेळेनुसार रात्रीच्या जेवणाची वेळ ठरवावी.

**जेवण लवकर करण्याचे काही दुष्परिणाम आहे का?**

होय, जर तुमचे रात्रीचे जेवण खूप लवकर झाले तर झोपेच्या वेळ आणि जेवणाच्या वेळेतील अंतर वाढते आणि लोक रात्री विनाकारण स्नॅक्स खातात. यामुळे अनेकदा जास्त कॅलरी असलेले, प्रक्रिया केलेले पदार्थ खाल्ले जातात, ज्यामुळे रात्रीचे जेवण लवकर करण्याचे फायदे कमी होतात.

**शहरी जीवनशैलीसाठी कोणता संतुलित दृष्टिकोन योग्य ठरेल?**

जेवणाची वेळ काटेकोरपणे पाळण्याऐवजी, रात्रीचे जेवण हलके आणि संतुलित असेल याचा प्रयत्न करा. त्यात डाळ, भाज्या आणि माफक प्रमाणात कर्बोदकांचा समावेश करा. रात्री उशिरा तळलेले जड पदार्थ किंवा गोड मिष्टान्न खाणे टाळा. सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे; कठोर नियमांपेक्षा जेवणाच्या नियमित वेळांना तुमचे शरीर अधिक चांगला प्रतिसाद देते. लवकर जेवल्याने पचन आणि झोपेसाठी मदत होऊ शकते, पण वैयक्तिक आवडीनिवडी महत्त्वाच्या आहेत. आपल्या शरीराच्या संकेतांकडे लक्ष द्या, जेवणाची वेळ आपल्या दिनक्रमानुसार जुळवा आणि केवळ वेळेवरच नव्हे, तर तुम्ही काय आणि किती खाता यावर लक्ष केंद्रित करा.



*अमळनेर : विद्यार्थ्यांचे स्वागत करताना प्राचार्य पी. एम. कोळी, अनिल पाटील, गोपाल हाडपे, विजेंद्र गवळे आदी.*

# सावित्रीबाई फुले विद्यालयात प्रवेशोत्सव व पुस्तक वाटप सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेशोत्सव व पुस्तक वाटप सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. कोळी हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षक अनिल पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे प्रवेशद्वारावर पुष्पवृष्टी करून तसेच गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

प्रवेशोत्सवानिमित्त सादर करण्यात आलेल्या गीतामुळे शाळेचा परिसर उत्साहाने बहरून गेला होता. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या आगमनाने शाळेत आनंददायी वातावरण निर्माण झाले.

यावेळी गोपाल हाडपे, विजेंद्र गवळे, सुनील वाघ, समाधान पाटील, दीपक पाटील, नीलिमा पाटील, रूपाली पाटील, रामराव पाटील, अविनाश बाविस्कर, सुरेश पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रीय कराटे स्पर्धेत इशिका खैरनारचा झेंडा; नॅशनल बेस्ट प्लेयर अवॉर्डने केले सन्मानित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : येथील सायरदेवी बोहरा सेंट्रल स्कूलमधील इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी इशिका शरद खैरनार हिने राष्ट्रीय कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत नॅशनल बेस्ट प्लेयर अवॉर्ड पटकावला असून शाळेसह संपूर्ण अमळनेरचे नाव उज्ज्वल केले आहे.

दि. १३ व १४ जून २०२६ रोजी विदर्भ केसरी खासदार रामदासजी तडस इंडोर स्टेडियम, देवळी जि. वर्धा येथे स्पोर्ट्स शोतोकान कराटे-डो असोसिएशन ऑफ इंडिया संलग्नित स्पोर्ट्स कराटे असोसिएशन, वर्धा यांच्या वतीने राष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. इशिकाने स्पर्धेतील काता आणि कुमिते या दोन्ही प्रकारांमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विशेष यश संपादन केले. तिच्या दमदार कामगिरीची दखल घेत आयोजकांकडून तिला नॅशनल बेस्ट प्लेयर अवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले. इशिकाच्या या यशाबद्दल शाळेचे चेअरमन सुरेंद्र बोहरा, मुख्याध्यापक जितेंद्र सिंह, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले. यावेळी चेअरमन बोहरा यांनी इशिकाच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील पुढील वाटचालीस शुभेच्छा देत भविष्यात ती आणखी मोठी यशाची शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला.

## लिनेस क्लबचा स्तुत्य उपक्रम

# प्रताप हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



*अमळनेर : शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना लिनेस क्लबच्या अध्यक्ष कविता पारख, जास्मीन भरूचा, जया जैन, डॉ. मंजुश्री जैन, शारदा अग्रवाल*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होऊन त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ मिळावे या उद्देशाने लिनेस क्लबतर्फे येथील प्रताप हायस्कूलमध्ये शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमास लिनेस क्लबच्या अध्यक्षा कविता पारख, इन्चार्ज ऑफिसर जास्मिन भरूचा, कॅबिनेट ऑफिसर जया जैन, डॉ. मंजुश्री जैन तसेच शारदा अग्रवाल उपस्थित होत्या. त्यांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. बाविस्कर यांनी केले.यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कविता पारख यांनी शिक्षणाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच भविष्यात शाळेला आणखी शैक्षणिक साहित्याची आवश्यकता भासल्यास लिनेस क्लबतर्फे शक्य ते सहकार्य करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.यानंतर विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, शैक्षणिक किट तसेच इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक पुस्तके वितरित करण्यात आली. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत होता.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंदांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रतिनिधी डी. एन. पालवे यांनी केले, तर आभार एस. ए. खांजोडकर यांनी केले.

> ***गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती आणि माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी प्रताप हायस्कूल साठी मदत करावी.***
>
> ***कविता पारख, लिनेस क्लब अध्यक्षा***

# दुपारच्या जेवणात चपाती खावी की भात? काय आहे जास्त फायदेशीर?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



चपाती आणि भात या दोन्हींमधून शरीराला ऊर्जा मिळविण्यासाठी आवश्यक असणारे कार्बोहायड्रेट्स सारख्याच प्रमाणात मिळतात. चपातीमध्ये गव्हातील फायबरचे प्रमाण जास्त असल्याने ती पचायला वेळ घेते आणि शरीरातील रक्तातील साखर हळूहळू वाढते.

चपाती खाल्ल्याने बऱ्याच वेळेस भूक लागत नाही. ज्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यास आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते. तांदूळ हा चपातीपेक्षा पचायला अत्यंत हलका असतो. त्यामुळे ज्यांना पचनाचा त्रास आहे त्यांच्यासाठी दुपारच्या जेवणात भात खाणे फायदेशीर ठरते. भाताचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असल्याने तो खाल्ल्यानंतर शरीरातील रक्तातील साखर वेगाने वाढू शकते.

भात खाल्ल्यानंतर शरीरात 'सेरोटोनिन' हार्मोन तयार होतो. ज्यामुळे दुपारच्या वेळी जास्त आळस किंवा सुस्ती येण्याची शक्यता असते. चपातीमधून शरीराला लोह, कॅल्शियम आणि फॉस्फरस सारखी खनिजे मिळतात, तर पांढऱ्या भातातून ही पोषक तत्त्वे तुलनेने कमी मिळतात.

जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तर भाताऐवजी चपाती किंवा पांढऱ्या भाताऐवजी 'ब्राउन राईस' खाणे विज्ञानानुसार योग्य मानले जाते. आरोग्याच्या दृष्टीने दुपारच्या जेवणात चपाती आणि भात या दोन्हींचा मर्यादित प्रमाणात समावेश करणे हा संतुलित आहाराचा समन्वय आहे.

# चार महिन्याच्या प्रलंबीत वेतनासाठी माजी आमदार डॉ. तांबेंना साकडे!

**पान १ वरून :** महिन्यापासून पगारापासून वंचित आहे.

संच मान्यतेत झालेली मानवी दुरुस्त करायची नाही आणि दुसरीकडे कारण नसताना याच शिक्षकांना धारेवर धरत चार महिन्यापासून पगाराविना ताटकळत ठेवणे हे कितपत योग्य आहे, असा सवाल ही उपस्थित होत आहे.

**सात महिन्यात दुसऱ्यांदा आडकाठी!**

या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना यापूर्वीही 'मार्च एंडिंग' ला हेच कारण पुढे करत चार महिने पगारापासून वंचित ठेवले होते. शेवटच्या क्षणी तीन महिन्यांचा पगार काढला, मात्र फेब्रुवारी महिन्याचा पगार विनाकारण थांबल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. आता पुन्हा तेच कारण पुढे करत चार महिन्यापासून या शिक्षकांना पगारापासून वंचित ठेवले आहे.

**विनाकारण आर्थिक भुर्दंड!**

गेल्या चार महिन्यापासून शिक्षकांचे पगार नसल्याने गृहकर्ज, एलआयसी चे तसेच इतर हप्ते भरणाऱ्या कर्मचाऱ्यांना नाहक आर्थिक दंडाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. विमा संरक्षण कवच नसल्याने अडचणी निर्माण होऊ शकतात.

वेगवेगळी कारणे दाखवून शिक्षकांचा पगार रोखला जात आहे. या प्रश्नांचे गांभीर्य ओळखून शासनाने तत्काळ पावले उचलली नाहीत, तर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड संताप निर्माण होईल त्याचा विपरीत परिणाम अध्यापनावर होईल, एवढे मात्र निश्चित!

**माजी आमदार यांना दिले निवेदन! :** 'नवलभाऊ प्रतिष्ठान'चे मानद शिक्षण संचालक प्रा सुनिल गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली आर्मी स्कुल प्राचार्य बी डी पाटील, राज्य सैनिकी शाळा असोसिएशन चे राज्य कार्यकारणी सदस्य उमेश काटे यांनी डॉ सुधीर तांबे यांना निवेदन देत विविध विषयावर चर्चा केली. यावेळी जेष्ठ शिक्षक सुनिल महाले, एस बी पवार, आर ए घुगे, ए ए वानखेडे, मयुर पाटील, हेमंत मोरे, सलीम तडवी यांच्यासह शिवशाही फाउंडेशचे अध्यक्ष जयेशकुमार काटे, उपक्रमशील शिक्षक देवेंद्र महाजन उपस्थित होते. यावेळी सैनिकी शाळेतील कार्यरत शिक्षकांच्या विविध प्रकारच्या वेतन समस्या जाणून घेतल्या. ज्यूनिअर कॉलेज ची संच मान्यता ही नाशिक येथील प्रशासनाच्या चुकीमुळेच उद्भवली असल्याचे निदर्शनास आणून दिले. याबाबत शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून या समस्याचे त्वरित निराकरण करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणार असल्याचे आश्वासित केले. यासाठी पदवीधर आमदार सत्यजित तांबे हे पण पाठपुरावा करीत आहेत.

## अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती
## दैनिक बाजारभाव

| प्रकार | भाव | |
|---|---|---|
| | कमी | जास्त |
| गहू | २३२५ | २३९२ |
| बाजरी | २१५० | २३२९ |
| दादर | २८०० | ३३०० |
| हा.ज्वारी | २३५० | २३७६ |
| मका लाल | २००० | २१५० |
| मुंग | ७४०१ | ७७५० |
| उडीद | -- | --- |
| हरभरा काबुली व्ही.टू. | ५६०० | ५९६६ |
| हरभरा गावराणी | ५००० | ५२०० |
| हरभरा गुलाबी | ४७०० | ५००० |
| हरभरा चापा | ५४०० | ५४३१ |
| हरभरा डॉलर सफेद | ७०५५ | ७३५५ |
| हरभरा गुल्लर | -- | -- |
| चवळी | -- | -- |
| तूर | ६५०० | ६८०० |
| शेंगा | -- | ८५०० |
| तीळ | ७००० | ८८५१ |
| सोयाबीन | -- | -- |
| सूर्यफुल | -- | -- |
| धणे | -- | -- |
| जिरे | -- | -- |
| पांढरी तूर | -- | -- |

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# भारत का इकलौता गांव जहां हर घर में घूमते हैं सांप

## एक ही छत के नीचे रहते इंसान और नागराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुनिया में सांपों का नाम सुनते ही लोगों के पसीने छूट जाते हैं, लेकिन महाराष्ट्र के सोलापुर जिले में स्थित शेतफल गांव की कहानी बिल्कुल अलग है। इस गांव को 'स्नेक विलेज' के नाम से जाना जाता है। यहां इंसान और जहरीले सांप (कोबरा) एक साथ एक ही छत के नीचे रहते हैं। यहां के लोगों के लिए सांपों का खौफ न के बराबर है। गांव के हर घर में सांपों के आराम करने के लिए एक खास जगह बनाई जाती है। सांप लोगों के साथ रहते हैं और आज तक किसी ने गांव वालों को नुकसान नहीं पहुंचाया है।

सांप का नाम सुनते ही अच्छे-अच्छों की रूह कांप जाती है। अगर गलती से भी कोई सांप घर में घुस आए, तो लोगों की जान हलक में अटक जाती है और वे तुरंत जान बचाने के लिए भागने लगते हैं। लेकिन क्या आप सोच सकते हैं कि भारत में एक ऐसा भी गांव है, जहां सांप मेहमान नहीं, बल्कि परिवार के सदस्य की तरह रहते हैं? जी हां, यह कोई कहानी या साइंस फिक्शन नहीं, बल्कि एकदम सच है। यहां के लोग डरना भूल चुके हैं। जहरीले सांप उनके घरों में बेखौफ घूमते हैं और लोग उनकी पूजा करते हैं। इस अनोखे गांव ने अब दुनियाभर में 'स्नेक विलेज' के नाम से अपनी एक खास और रहस्यमयी पहचान बना ली है। यह अनोखा और रहस्यमयी गांव महाराष्ट्र के सोलापुर जिले में स्थित है, जिसे 'शेतफल' के नाम से जाना जाता है। आज के समय में यह पूरे भारत में 'स्नेक विलेज' के रूप में मशहूर हो चुका है। शेतफल की सबसे खास बात यह है कि यहां इंसान और खतरनाक सांपों (खासकर कोबरा) के बीच एक अद्भुत सह-अस्तित्व देखने को मिलता है। गांव के लोग पारंपरिक रूप से इन जहरीले सांपों को डर या खौफ की नजर से नहीं, बल्कि गहरी आस्था और सम्मान की दृष्टि से देखते हैं।



शेतफल गांव को जो बात दुनिया के बाकी हिस्सों से बिल्कुल अलग बनाती है, वह है यहां के घरों की बनावट। गांव के लगभग हर घर के अंदर सांपों के रहने और आराम करने के लिए एक विशेष स्थान बनाया जाता है। इसे सांपों का 'विश्राम स्थल' माना जाता है। गांव वालों का मानना है कि घर की सीमा के भीतर सांपों के लिए एक उचित जगह होनी चाहिए। यह सदियों पुरानी परंपरा है जिसे आज भी हर घर में पूरी आस्था के साथ निभाया जा रहा है।

पर्यटकों को सख्त हिदायत दी जाती है कि वे वन्यजीवों को परेशान न करें और बिना अनुमति किसी के निजी घर में प्रवेश न करें। हमेशा गांव से जुड़ी स्थानीय रीति-रिवाजों और आस्थाओं का सम्मान करें। अगर आप भी इस अद्भुत 'स्नेक विलेज' की यात्रा करना चाहते हैं, तो इसके लिए अक्टूबर से फरवरी के बीच का समय सबसे बेहतरीन माना जाता है। इस दौरान मौसम ठंडा और आरामदायक रहता है, जबकि गर्मियों में यह इलाका काफी गर्म हो सकता है। इस गांव की यह अनोखी पहचान मुख्य रूप से धार्मिक मान्यताओं और सांपों की पूजा करने की प्राचीन परंपरा में गहराई से निहित है। हिंदू संस्कृति और मान्यताओं में नाग पूजा को हमेशा से सांस्कृतिक सम्मान के साथ जोड़ा गया है। शेतफल के निवासियों का अटूट विश्वास है कि सांप बेहद पवित्र होते हैं। भले ही वे कितने भी जहरीले क्यों न हों, ग्रामीण उन्हें भगवान का स्वरूप मानते हैं। यही कारण है कि सांप उनके घरों के भीतर एक सम्मानित सदस्य की तरह विचरण करते हैं। हैरानी की बात यह है कि इन खतरनाक सांपों ने आज तक गांव के किसी भी निवासी को कोई नुकसान नहीं पहुंचाया है। गांव वालों का दृढ़ विश्वास है कि यह शांतिपूर्ण और आपसी सह-अस्तित्व का ही नतीजा है कि सांप उनके लिए खतरा नहीं बनते। जहां भारत के अन्य हिस्सों में केवल नाग पंचमी जैसे त्योहारों पर ही सांपों की विशेष पूजा की जाती है, वहीं शेतफल में यह सम्मान और पूजा किसी एक दिन तक सीमित नहीं है, बल्कि यह उनके रोजमर्रा के जीवन का हिस्सा है। दुनिया के किसी भी कोने में सांप को देखकर लोग उसे भगाने या मारने की कोशिश करते हैं, लेकिन शेतफल के ग्रामीण ऐसा बिल्कुल नहीं करते। इस गांव में बच्चे बचपन से ही सांपों को अपने आसपास रेंगते और खेलते हुए देखते हुए बड़े होते हैं। यही वजह है कि वे सांपों की हरकतों को अच्छी तरह समझते हैं और उनके मन में सांपों को लेकर कोई डर नहीं पनपता। धीरे-धीरे यह सब उनके दैनिक जीवन का एक बहुत ही सामान्य हिस्सा बन गया है।

अपनी इसी अनोखी संस्कृति के कारण शेतफल गांव धीरे-धीरे पर्यटकों के लिए भी एक बड़ा आकर्षण बन गया है। दूर-दूर से लोग यह देखने आते हैं कि आखिर कैसे इंसान और सांप एक साथ शांति से रह सकते हैं। यह गांव इस बात का जीवंत प्रमाण है कि कैसे पीढ़ियों से चली आ रही स्थानीय परंपराएं और मान्यताएं किसी भी जगह के चरित्र और वहां की जीवनशैली को पूरी तरह से आकार दे सकती हैं। यह यात्रियों को एक अद्भुत सांस्कृतिक अनुभव प्रदान करता है।

हालांकि, इस गांव में आने वाले पर्यटकों के लिए कुछ बेहद सख्त नियम भी बनाए गए हैं। पहली शर्त यह है कि पर्यटकों को कभी भी सांपों के प्रति नफरत, ईर्ष्या या गुस्से की भावना के साथ इस गांव में नहीं आना चाहिए। इसके अलावा, सांपों के खिलाफ किसी भी तरह की हिंसक कार्रवाई करना या उन्हें छूने और पकड़ने की कोशिश करना पूरी तरह से वर्जित है। पर्यटकों को हमेशा स्थानीय लोगों के निर्देशों का सख्ती से पालन करना चाहिए।

# क्लासिकल गायिका बनली आयएएस!

## पल्लवी यांनी कोचिंगशिवाय मिळविले यूपीएससी परीक्षेत मोठे यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**

कायद्याची पदवी आणि शास्त्रीय संगीतात मास्टर्स केल्यानंतर त्यांनी यूपीएससीची तयारी केली. पहिल्या प्रयत्नात अपयश आले, तरी त्यांनी हार मानली नाही. निबंध लेखनावर लक्ष केंद्रित करून आणि सातत्याने सराव करून २०२२ मध्ये त्यांनी हे मोठे यश संपादन केले.

### प्रेरणादायी कहाणी

पल्लवी मिश्रा यांची ही प्रेरणादायी कहाणी आहे. त्यांनी कोणत्याही कोचिंगशिवाय यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आणि ऑल इंडिया रँक ७३ मिळविली. भोपाळच्या पल्लवी मिश्रा यांनी आपल्या मेहनतीने हे यश संपादन केले.

### कुटुंबीयांचा पाठिंबा

पल्लवी मिश्रा यांचे वडील अजय मिश्रा हे वरिष्ठ वकील आहेत, तर आई डॉ. रेनू मिश्रा या वैज्ञानिक आहेत. त्यांचे मोठे बंधू आदित्य मिश्रा हे आयपीएस अधिकारी आहेत. कुटुंबाचा पाठिंबा आणि भावाची प्रेरणा यामुळे पल्लवी यांना बळ मिळाले. कठीण काळात कुटुंबीयांनी त्यांना साथ दिली आणि पुढे जाण्याची हिंमत दिली.

### कायद्याची पदवी

पल्लवी मिश्रा यांनी शालेय शिक्षण भोपाळमधून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी दिल्ली येथील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीतून कायद्याची पदवी मिळविली. शिक्षणासोबतच त्यांना शास्त्रीय संगीताची आवड होती. त्यांनी शास्त्रीय संगीतात मास्टर्स केले आणि पंडित सिद्धराम स्वामी कोरवर यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेतले. मात्र, देशाची सेवा करण्याचे त्यांचे स्वप्न होते. ज्यामुळे त्या यूपीएससीकडे वळल्या.

### पहिला प्रयत्न अयशस्वी

यूपीएससी परीक्षेत पल्लवी यांचा पहिला प्रयत्न अयशस्वी ठरला. मात्र, त्यांनी हार मानली नाही. त्यांनी आपल्या चुकांमधून शिकले आणि पुढील प्रयत्नासाठी सज्ज झाल्या. पल्लवी यांनी विशेषतः निबंध लेखनावर लक्ष केंद्रित केले आणि सातत्याने सराव केला. त्यांच्या मेहनतीचे फळ मिळाले आणि २०२२ मध्ये त्यांनी ऑल इंडिया रँक ७३ मिळविली.



### समाजमाध्यमांवर सक्रिय

पल्लवी मिश्रा सध्या पंजाब केडरमध्ये (पंजाब) अतिरिक्त उपायुक्त (एडीसी) म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्या जम्मू आणि काश्मीरमधील जम्मू जिल्ह्यातील मारह भागात उपविभागीय दंडाधिकारी (एसडीएम) होत्या. इन्स्टाग्रामवर त्यांचे ८८ हजारांपेक्षा जास्त फॉलोअर्स आहेत. जेथे त्या आपल्या प्रवासाविषयी आणि प्रेरणादायी विचार शेअर करतात. त्यांचे पतीही आयएएस अधिकारी आहेत.

# महामार्गावरील स्वस्त ढाब्यात जेवायचे का?

## मेनूमध्ये पनीरचे अनेक पदार्थ इतके स्वस्त का मिळतात? जाणून घ्या.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महामार्गावरील कोणत्याही स्वस्त ढाब्यात जेवायला गेले तर मेनूमध्ये किमान ६ पदार्थ पनीरचे मिळत असतात. ५ स्टार हॉटेलमध्ये गेले, तर वेजिटेरियन सेक्शनमध्ये ६० टक्के डिशेस पनीरच्या असतात. त्यामध्ये ३० रुपयांत ६ पनीर मोमोज? ५० रुपयांत पनीर पिझ्झा? १०० रुपयांत बटर पनीर? ४० रुपयांत पनीर कुलचा?



२० वर्षांपूर्वीही आपण जेव्हा सांगायचो की मी पनीर खात नाही. तेव्हा लोक म्हणायचे, की 'इतकी प्रोटीनयुक्त गोष्ट का नाही खात?' तेव्हापासून वाटायचे, की हा पनीर खरा नसावा. मग घरीच पनीर बनवायला सुरूवात केली. ७० रुपयांत १ लिटर अमूलचे फुल क्रीम दूध घेतो. त्यातून साधारण २०० ग्रॅम पनीर मिळतो. म्हणजेच १ किलो पनीर बनविण्यासाठी ५ लिटर दूध लागते. ज्याची किंमत ३५० रुपये होते. म्हणजेच खऱ्या दुधाचा पनीर बनवला तर त्याची किमान किंमत ३५० रुपये तरी येते. जर दुधाचा फॅक्टरी भाव लिटरला ५० रुपये धरला तरीही फक्त दुधासाठी २५० रुपये खर्च येतो. यात मजुरी, गॅस, इंधन वगैरे जोडल्यास हा खर्च ६० रुपयांपर्यंत पोहोचतो. सप्लाय चेन, लॉजिस्टिक्स वगैरे जोडल्यास ही किंमत ६३ रुपयांपर्यंत जाते.

म्हणजेच किमान ३१५ रुपये किलो खर्च येऊन जर दुकानदाराने १० टक्के नफा घेतला (जो प्रत्यक्षात त्यापेक्षा जास्त असतो), तर ग्राहकाला तो पनीर किमान ३४५ ते ३५० रुपये किलो भावाने मिळाला पाहिजे. आता जर तुम्ही २०० किंवा २५० रुपयांत किलो पनीर घेत असाल, तर दुकानदाराने दानछत्र उघडले आहे का? जे तो तुम्हाला खर्चापेक्षा २५ टक्के कमी दरात विकतो? खऱ्या पनीरची किंमत आणि प्रमाण समजून घ्यायचे असेल, तर घरी पनीर बनवून पाहा, कळेल.

मग येतो 'अनालॉग पनीर' म्हणजे पनीरसारखा दिसणारा आणि त्याच्या टेक्स्चरसारखा पदार्थ. ज्याचे मुख्य घटक म्हणजे पावडर दूध, वनस्पती तेल, पाम ऑईल, अरारोट, स्टेबिलायझर्स आणि डेव्हलपिंग एजंट्स. पावडर मिल्कमध्ये फॅट नसल्यामुळे त्यात डालडा आणि पाम ऑईल मिसळले जाते. ज्यामुळे त्याची घनता वाढते. ही तेलच ती आहेत, जी आपल्या रक्तवाहिन्यांत जमून जातात. हा अनालॉग पनीर तुम्हाला मोठ्या ५ स्टार हॉटेल्समध्येसुद्धा मिळतो, भले तुम्ही पनीर टिक्का खात असाल किंवा पनीर दो प्याजा.

याहूनही खालच्या दर्जाचा असतो यूरिया, डिटर्जेंट आणि मैद्याच्या मिश्रणातून बनविलेला पनीर म्हणजे तो पनीर, जो तुम्ही ३० रुपयांत ६ मोमोजमध्ये किंवा ५० रुपयांत पनीर लोडेड पिझ्झा बर्गरमध्ये खात आहात. हा यूरिया थेट तुमच्या मूत्रपिंड आणि यकृतावर हल्ला करतो आणि दीर्घकाळ सेवन केल्यास जीवघेणा ठरू शकतो.

भारतात दररोज ६४ कोटी लिटर दूध उत्पादन होते. जर हे सर्व दूध फाडून पनीर बनवले गेले, तर साधारण १ कोटी २० लाख किलो पनीर बनू शकतो. पण दररोज पनीरचा वापर साधारण १५ हजार टन आहे. हे शक्य आहे का, की १ कोटी ५० लाख किलो पनीर ६४ कोटी लिटर दुधातून बनेल?

बाजारात मिळणाऱ्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त पनीर नकली आहे. हे नकली पनीर रस्त्याकडच्या ढाब्यांपासून ते ५ स्टार हॉटेल्सपर्यंत सर्वत्र वापरले जात आहे. गेल्या ३० वर्षांत यकृत आणि मूत्रपिंडाच्या रोगांमध्ये जबरदस्त वाढ झाली आहे, यामागील कारण काय?

कधीतरी त्या छोट्या-छोट्या गल्ल्यांमध्ये जाऊन बघा, जेथे यूरियाची मोठमोठी पातेली उकळत असतात. जे लोक ते बनवत आहेत, त्यांना सांगा, की ते स्वतःच बनविलेला पनीर खाऊन दाखवावा.

पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही हॉटेलमध्ये पनीरची डिश ऑर्डर कराल, तेव्हा सांगा, की एक कच्चा पनीरचा तुकडा आणून दाखवावा. तेव्हा ते हजार बहाणे करतील. एखादा रेस्टॉरंटवाला असेही सांगेल, की 'जेवायचे असेल तर जेवा, नाहीतर जा. आम्ही सॅम्पल दाखविणार नाही.'





शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# लक्ष्मीस्तोत्रामुळेच देवराज इंद्र यांना गतवैभव प्राप्त

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

लक्ष्मीस्तोत्र हे देवराज इंद्राने रचिले असून, या स्तोत्रामुळेच त्यांना गतवैभव प्राप्त झाले. त्यामुळे या स्तोत्राचे आपण सर्वांनी नित्य पठण करायला हवे. विशेषतः कोजागिरी पौर्णिमेला या स्तोत्राचे १६ वेळेस पठण केल्यास मनुष्याला अलभ्य असे लाभ प्राप्त होतात, अशी मान्यता आहे. या स्तोत्रात पहिले सोळा श्लोक हे देवी लक्ष्मींच्या स्तुतीचे असून, उर्वरित पाच श्लोक हे फलश्रुतीचे आहेत.

**इंद्र उवाच!**

**(१) नमस्ते सर्वभूतानां जननीमब्जसंभवाम् ।**
**श्रियमुनिन्द्र पद्माक्षीं विष्णुवक्ष:स्थलस्थिताम॥**

इंद्र म्हणाला!
समस्त प्राणीमात्रांची जननी, कमलोद्भवा, प्रफुल्लित कमलाप्रमाणे तेजस्वी नेत्र असलेल्या आणि भगवान श्रीविष्णूंच्या वक्ष:स्थलावर विराजमान झालेल्या देवी लक्ष्मींना माझा नमस्कार असो.

**(२) त्वं सिद्धिस्त्वं स्वधा स्वाहा त्वं मातर्लोकपावनी।**
**सन्ध्या,रात्रि,प्रभा भूतिर्मेधा श्रद्धा सरस्वती ॥**

हे माते! सिद्धी, स्वधा आणि स्वाहास्वरूप अशी तू समस्त लोकांना पावन करतेस. तू संध्या, रात्र, प्रकाश, ऐश्वर्य, बुद्धी, श्रद्धा आणि वाक्शक्तिस्वरूप आहेस.

**(३) यज्ञविद्या महाविद्या गुह्यविद्या च शोभने।**
**आत्मविद्या च देवि त्वं विमुक्तिफलदायिनी ॥**

हे देवी! यज्ञविद्या, महाविद्या, मंत्राची गुह्यविद्या मोक्ष प्राप्त करणारे फल प्रदान करणारी आत्मविद्या तूच आहेस.

**(४) आन्विक्षिकी त्रयी वार्ता दण्डनीतिस्त्वमेव च ।**
**सौम्या सौम्यैर्जगद्रूपैस्त्वयैतद्देवि पूरितम् ॥**

हे देवी ! तीन वेद, तर्कशास्त्र वार्ता आणि राजनीति ही सारी तुझीच रूपे आहेत. आपल्या सौम्य आणि उग्र अशा अनेक रूपांनी तू हे जग पूर्णावस्थेस नेले आहेस.



**(५) का त्वन्या त्वामृते देवि सर्वयज्ञामयं वपु:।**
**अध्यास्ते देवदेवस्य योगचिन्त्यं गदाभृतः ॥**

हे देवी ! योगगम्य,सर्व यज्ञात्मक, देवाधिदेव आणि गदाधारी श्रीविष्णूच्या हृदयावर विराजमान होणे तुझ्या खेरीज अन्य कोणा स्त्रीस शक्य आहे?

**(६) त्वया देवि परित्यक्तं सकलं भुवनत्रयम्।**
**विनष्टप्रायमभवत्वयेदानीं समेधितम्॥**

हे देवी तू त्याग केल्यामुळे नष्टप्राय झालेले हे त्रैलोक्य तुझ्या येण्याने समृद्ध बनले आहे.

**(७) दारा: पुत्रस्तथा$ गारं सुहृद्धान्यधनादिकम्।**
**भवत्येतन्महाभागे नित्यं त्वद्धीक्षणान्नृणाम् ॥**

हे भाग्यवती! लक्ष्मीदेवी! तमच्याच कृपादृष्टीमुळे मनुष्यांना स्त्री, पुत्र, गृह, मित्र, धन, धान्य आदीची प्राप्ती होते.

**(८) शरीरारोग्यमैश्वर्यमरिपक्षक्षय: सुखम्।**
**देवि त्वदृष्टिदृष्टानां पुरुषांणां न दुर्लभम्॥**

हे देवी तुझ्या कृपादृष्टीचा लाभ झालेल्या व्यक्तींना शरीरारोग्य, शत्रुनाश, आणि ऐश्वर्य हे इप्सिते सहजी साध्य होतात.

**(९) त्वमम्या सर्वभूतानां देवदेवो हरिः पिता ।**
**त्वयैदविष्णुना चांब्व जगद्व्याप्तं चराचरम् ॥**

हे देवी समस्त प्राणीमात्रांची माता आणि देवदेवेश्वर भगवान विष्णू पिता आहेत. तुम्हा उभयतांनी ते समस्त चराचर जग व्यापले आहे.

**(१०) मा न: कोशं तथा कोष्टं मा गृहं मा परिछदम्।**
**मा शरीरं कलत्रं च त्यजेथा सर्वपावनि ॥**

हे सर्वपावनी देवी आमचे धनागार ( पैशांची तिजोरी ) धान्याची कोठारे, गृह, तसेच आमची शरीरे आणि आमचे स्त्रीधन यांचा त्याग करून तू जाऊ नकोस.

**(११) मा पुत्रान्मा सुहृदवर्गान्मा पशून्मा विभूषणम्।**
**त्यजेथा देवदेवस्य विष्णोर्वक्ष:स्थलाश्रये ॥**

देवदेवेश्वर विष्णूच्या वक्ष:स्थली निवास करणाऱ्या हे देवी आमचे पुत्र, सुहृद (आप्त),पशू तसेच अलंकार यांनाही तू त्यजू नकोस.

**(१२) सत्त्वेन सत्यशौचाभ्यां तथा शीलादिभिर्गुणै:।**
**तज्यंते ते नरा सद्य: शीलाद्यैराखिलैर्गुणै: ॥**

हे अमले तू त्याग केलेल्या भक्तांना त्यांचे धैर्य, सत्यप्रियता,बाह्य आणि अंतरीक शुद्धी आदि सत्गुण तत्काळ सोडून जातात.

**(१३) त्वयावलोकिता सद्य: शीलाद्यैराखिलैर्गुणै: ।**
**कुलैश्वर्यैश्च युज्यंते पुरुषा निर्गुणा अपि ॥**

याचे उलट तू कृपादृष्टीने अवलोकन केलेल्या साधकाची निर्गुणता नाहिशी होऊन तो शीलसंपन्न,कुलीन आणि ऐश्वर्यसंपन्न बनतो.

**(१४) स श्लाघ्य: स गुणी धन्य: स कुलीन: स बुद्धिमान ।**
**स शूर: स च विक्रान्तो यस्त्वया देवि वीक्षित:॥**

हे देवी तुझी कृपादृष्टी प्राप्त झालेली व्यक्ती गुणी, धन्य, कुलीन, बुद्धिमान, शूर आणि पराक्रमी बनते.

**(१५) सद्यो वैगुण्यमायान्ति शीलाद्या: सकला गुणा:। परांगमुखी जगद्धात्री यस्य त्वं विष्णुवल्लभे ॥**

हे सकलजगज्जननी विष्णुवल्लभे, तू ज्याचेपासून परांगमुख दूर होतेस त्याच्या शील आदी समस्त सद्गुणांचे दुर्गुणात
रूपांतर होते.

**(१६) न ते वर्णयितुं शक्ता गुणाजिव्हापि वेधस:।**
**प्रसीद देवी पद्माक्षी मास्मांत्याक्षी: कदाचन ॥**

हे देवी ब्रह्मदेव आदीकांची वाणीही तुझे गुणवर्णन करण्यास असमर्थ आहे. हे कमलनयने तू मजवर प्रसन्न हो आणि कधीही माझा त्याग करू नकोस .

## शुक्रवारी 'या' वस्तू दान केल्यास सर्व समस्यांचे निराकरण

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू धर्मात शुक्रवारचा दिवस सर्व देवींना समर्पित आहे. या दिवशी लक्ष्मी आणि संतोषी माता यांची पूजा केली जाते. असे मानले जाते, की या दिवशी देवी लक्ष्मी यांची पूजा-अर्चा केल्याने व्यक्तीच्या जीवनात सुख-समृद्धी येते. शुक्रवारी दान वगैरेचेही विशेष महत्त्व आहे.

असे मानले जाते, की या दिवशी दान केल्याने केवळ सुख आणि समृद्धी मिळत नाही तर शुक्र ग्रहाला बळ मिळते. ज्योतिषी सांगतात, की जर मुलांच्या कुंडलीत शुक्र ग्रह बलवान असेल तर त्यांचे लग्न लवकर होते. तसेच लक्ष्मी माता यांचा आशीर्वाद प्राप्त होतो. शुक्रवारी या वस्तूंचे दान केल्यास फळ मिळते.

### शुक्रवारी या वस्तूंचे दान करा

विवाहित महिलांनी शुक्रवारी लाल रंगाचा शृंगार करून बांगड्या, साडी, सिंदूर, कुंकू इत्यादी दान करावे. असे केल्याने लक्ष्मी माता प्रसन्न होतात. एवढेच नव्हे, तर जीवनातील सर्व संकटे दूर होतात. शुक्रवारी गरीब आणि गरजूंना जुनी पुस्तके किंवा जुने चप्पल, बूट इत्यादी दिल्याने शुभ होते. या दिवशी मीठ दान केल्याने शुक्र ग्रहाशी संबंधित दोष दूर होतात. असे मानले जाते, की शुक्रवारी रेशमी कपडे, जुनी चादर इत्यादी वस्तू दान केल्याने घरात आनंदाचे वातावरण राहते. तसेच वैवाहिक जीवनात गोडवा येतो. शुक्रवारी विधवेला पांढरे वस्त्र दान केल्याने सौभाग्य प्राप्त होते. वास्तूनुसार घरात कचरा ठेवू नये. शुक्रवारी रद्दी पेपर कोणत्याही गरजूला मोफत द्या. असे केल्याने लक्ष्मी माता प्रसन्न होतात.

# किस प्रकार से लक्ष्मी का लोप हो जाता है?
## किन-किन कार्यों से लक्ष्मी अपना निवास नहीं बनाती?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

- जो व्यक्ति आलसी होते हैं, जो ईश्वर में विश्वास नहीं करते, जो आचारभ्रष्ट, चोर तथा कपटी होते हैं, उनके पास लक्ष्मी नहीं रहती।
- जो व्यक्ति गुरु के प्रति अनादर व्यक्त करता है, जो गुरु के घर में चोरी करता है, जो गुरु पत्नी पर बुरी नजर रखता है, उसके घर में लक्ष्मी नहीं रहती और हमेशा के लिए चली जाती है।
- जो व्यक्ति देवताओं पर बासी पुष्पों का प्रयोग करता है, मलिन और दुर्गंधयुक्त बना रहता है, जो टूटे-फूटे या फटे हुए आसन पर बैठता है ऐसे व्यक्तियों के घर लक्ष्मी नहीं रहती।
- जो व्यक्ति ब्राह्मण को, अग्नि को, भस्म को, गुरु को या माता-पिता को पांव से स्पर्श करता है या उन्हें पांव लगाता है, उसके घर से लक्ष्मी हमेशा के लिए चली जाती है।
- जो व्यक्ति एक पांव से दूसरा पांव रगड़ कर धोता है, जो गंदे स्थान पर सोता है, जो संध्या के समय स्त्री के साथ सहवास करता है और जो दिन में सोता है उसके घर में लक्ष्मी कभी नहीं रहती।
- जो व्यक्ति घर में आया हुआ या घर में बनाया हुआ मिष्ठान्न घर में रहने वालों को दिए बिना ही खा लेता है, जो घर की रसोई में भेदभाव रखता है उसको लक्ष्मी हमेशा के लिए छोड़ देती है।
- जो व्यक्ति अपने शरीर को बाजे की तरह बजाता है, या टेबल-कुर्सी को अंगुलियों से बजाता है, सिर या पैरों को गंदा रखता है उसका लक्ष्मी त्याग कर देती है।
- जो व्यक्ति मैले कपड़े पहनता है, अंधेरे घर में रहता है, असुंदर वेशभूषा या विचित्र वेशभूषा धारण करता है, रूखा-सूखा खाना खाता है, लक्ष्मी उसका त्याग अवश्य कर देती है।
- जो व्यक्ति अपने गले में पहनी हुई माला को दांतों से चबाता है या स्वयं तोड़ देता है या आलसी होता है या शरीर पर धूल जमाए रखता है, उसको लक्ष्मी छोड़ देती है।
- जो व्यक्ति पराया धन हड़पता है, जो परस्त्री गमन करता है, जो सूर्योदय के बाद भी सोया रहता है, जो नाखून, कोयला, कांटा या तिनके से पृथ्वी पर बेकार में लिखता रहता है, उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो व्यक्ति देवताओं की पूजा नहीं करता, जिनके बाल बेतरतीब होते हैं, जो ब्राह्मणों की निंदा करते हैं, जो व्यर्थ में अपनी उंगलियों को नचाते हैं, जो व्यर्थ में भाषण करते हैं, जो नग्न स्त्री को देखते हैं, लक्ष्मी उसका परित्याग कर देती है।



- जो व्यक्ति व्यर्थ ही हंसता रहता है, जो खाते-खाते हंसता है, जो चलते-चलते पानी पीता है, जो बीती हुई बात पर चिंता या दुख प्रकट करता है, जो उपकारी के प्रति कृतज्ञता प्रकट नहीं करता, जब दो व्यक्ति बात कर रहे हों, तब बिना पूछे उनके पास चला जाता हो उसके पास लक्ष्मी कभी नहीं रहती।
- जो व्यक्ति बुद्धिमान नहीं होते, धन प्राप्ति के लिए प्रयत्न नहीं करते, उनके घर में भी कभी लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री गंदी रहती है, पाप कर्म में रत होती है, जो परपुरुषों में मन लगाती है, जिनका स्वभाव दूषित होता है, जो बात-बात पर क्रोध करती है, जो अपने पति को दबाने के लिए रोष, प्रदर्शन, छल या मिथ्या भाषण करती है, उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री अपने घर को सजा कर नहीं रखती, जिसके विचार उत्तम नहीं होते, जो दूसरों के घर में भटकती रहती है या अपना घर छोड़ दूसरों के घर नित्य जाती रहती है, जिनको लज्जा नहीं आती उनके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री दयाहीन होती है, स्वभाव से निर्दयी होती है, दूसरों की चुगली करने में तत्पर रहती है, दूसरों को लड़ा-भिड़ाकर स्वयं को चतुर समझती है, ऐसे घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री अपने पति की प्रिय नहीं होती, उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री अपने घर में पूजा का स्थान नहीं रखती, जो देवताओं के सामने आरती, धूप नहीं करती, जो आरती नहीं गाती उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री अपने गुरु के प्रति अनादर रखती है, उसके घर में लक्ष्मी एक क्षण के लिए भी नहीं रहती।
- जिस व्यक्ति का कोई गुरु नहीं होता उसके घर लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री अधिक भोजन करने वाली, भोजन पकाते समय ही खाने वाली, जूठा भोजन परोसने वाली होती है उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो स्त्री दिन में सोती रहती है। माता-पिता, सास-ससुर का आदर नहीं करती, उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जिसके मन में ममत्व नहीं होता, जो दूसरों के दुख में दुखी नहीं होती, उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो व्यक्ति पुरुषार्थहीन और अकर्मण्य होता है, उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो व्यक्ति अपने घर में शिव, विष्णु, गणपति और शालिग्राम को स्थापित नहीं करता और इनकी नित्य पूजा नहीं करता उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जो व्यक्ति लक्ष्मी से संबंधित स्तोत्र, मंत्र आदि का पाठ नहीं करता, अनावश्यक व्यय करता है या जो केवल भोग में ही सुख समझता है उसके घर में लक्ष्मी नहीं रहती।
- जिसके घर में कलह होती है, जो अपनी पत्नी का बात-बात पर अपमान करता है, जो पत्नी को नौकर के समान समझता है, जो पत्नी के सुख-दुख में सहायक नहीं होता, उसके घर में लक्ष्मी कभी भी स्थायी रूप से नहीं रहती।

# साडेतीन शक्तिपीठांपैकी मूळ जागृत पीठ श्रीक्षेत्र माहूरची श्री रेणुका देवी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा


नांदेड जिल्ह्यात श्रीक्षेत्र माहूर वसले आहे. माहूर हे भारतातील महाराष्ट्रामधील नांदेड जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. ते नांदेड शहरापासून १३० किलोमीटर अंतरावर आहे.

देवींच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असून, येथील पीठाची देवता रेणुका माता आहेत. रेणुका माता तसेच भगवान दत्तात्रय आणि परशुराम यांचीही प्राचीन मंदिरे माहूरगडावर आहेत. येथे मंदिरासमोरच एक किल्ला आहे. या किल्ल्यामध्ये अनेक वन्यजीव आढळून येतात.

देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ जागृत पीठ म्हणजे माहूरची श्री रेणुका माता आहेत. श्री परशुरामाची माता म्हणूनही रेणुका माता यांना ओळखले जाते. महाराष्ट्रातील अनेक परिवारांची या कुलदेवता आहेत. देवींचे मंदिर १३ व्या शतकात देवगिरीच्या यादवकालीन राजाने बांधले असल्याचे म्हटले जाते.

माहूरला रामगड अर्थात माहूर किल्ला, माहूर संग्रहालय, सोनापीर दर्गा, पांडवलेणी, राजे उद्धवराव ऊर्फ उदाराम देशमुखांचा वाडा अशा काही ऐतिहासिक वास्तू माहूरमध्ये बघण्यासारख्या आहेत. श्री रेणुका देवी मंदिर, अनुसया माता मंदिर, देवदेवेश्वर मंदिर इत्यादी धार्मिकस्थळे माहूरला आहेत. गावात एक छोटेखानी पुरातण वस्तुसंग्रहालय आहे. त्यात कलाकुसरीच्या अनेक वस्तू व पुरातन शिल्पे ठेवली आहेत. त्यातील अंगठ्याएवढी बालाजींची मूर्ती पाहण्यासारखी आहे.

या मंदिराबद्दल अनेक आख्यायिका आहेत. नवरात्रकाळात या गडावर भाविकांची गर्दी असते. हे शक्तिपीठ अत्यंत जागृत असून भक्तांच्या मनोकामना पूर्ण करते. कुब्ज नगराचा राजा 'प्रसेनजित' याला अपत्य नव्हते. अनेक व्रत, वैकल्ये केल्यानंतर खूप दिवसांनी त्याच्यापोटी आदिशक्ती पार्वती माता यांनी स्वतः जन्म घेतला. त्या राजाने आपल्या कन्येचे नाव 'रेणुका' ठेवले. रेणुका उपवर झाल्यावर तिचे लग्न जमदग्नी ऋषींशी झाले. ऋषी जमदग्नी यांना भगवान शंकर यांचे अवतार मानले जातात. त्यांच्या आश्रमात 'कामधेनू' नावाची गाय असे. कामधेनू सर्व कामना पूर्ण करणारी होती. या गायीची कीर्ती दूरवर पोहोचली होती. त्या गायीची प्रसिद्धी राजा सहस्रार्जुनापर्यंत पोहोचली. त्याने आश्रमात येऊन गायीची



मागणी ऋषींकडे केली. त्यावर ऋषींनी कामधेनू देण्यास राजाला नकार दिला. यावर संतापून राजाने ऋषींच्या आश्रमावर हल्ला केला आणि नासधूस केली. अचानक झालेल्या हल्ल्यात ऋषी जमदग्नींचा वध केला. नंतर मेहुणी रेणुकेवर २१ वार केले. त्यावेळी परशुराम तेथे नव्हते. परशुराम आल्यावर त्याला जे दृष्य दिसले ते फार विचित्र होते. आश्रमाची पडझड झाली होती, सर्व परिसर अस्ताव्यस्त झाला होता. तर एका बाजूस जन्मदात्या पित्याचा मृतदेह पाहून परशुराम नि:शब्द झाले. तेव्हा रेणुका माता उद्गारल्या, 'हे क्षत्रिय सहस्त्रार्दुना माझा पराक्रमी राम २१ वेळा ही पृथ्वी नि:क्षत्रीय करेल.'

परशुरामाने आपल्या आईची इच्छा व दिलेला शब्द पाळताना असे वचन दिले, की मी तुझी सर्व इच्छा पूर्ण करेन. परशुरामाने कावड तयार करून एका बाजूला जखमी आई, तर दुसऱ्या बाजूला पित्याचा मृतदेह ठेवला आणि त्यांच्या अंत्यविधीसाठी तो पवित्र भूमीच्या शोधात निघाला. सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी माहूर गंगेच्या तीरावर नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यात पोहोचला. हाच परिसर आपल्या पित्याच्या अंत्यविधीसाठी योग्य समजून पित्यास अग्नी दिला. रेणुका देवी त्यात सती जाण्यास निघाल्या. आपली आई आपल्याला सोडून सती चालली आहे. हे परशुरामाला पाहवेना. तो फार दुखी झाला. त्याला तो क्षण आठवला, की वडिलांच्या सांगण्यावरून आपण आपल्या आईचा शिरच्छेद केला होता. पण वडिलांनी दिलेल्या वरामुळे ती पुनर्जीवित झाली. मात्र, आताचा प्रसंग वेगळा होता. आई रेणुका देवी जखमी अवस्थेत होती आणि वडील मरणावस्थेत आणि त्यातही आई सती चालली होती. एकाच वेळी इतके दु:खद प्रसंग परशुरामावर आले. त्यामुळे तो व्याकुळ झाला. रेणुका देवींनी आपल्या मुलाचे मन जाणले. त्यांनी त्याला खूप उपदेश केले. त्यामुळे परशुराम स्थिरावला. आईच्या आज्ञेने त्याने पित्याच्या चितेस अग्नी दिला. नंतर त्याच चितेत आपली आई सती जाणार. हृदयभेदक तो प्रसंग पाहायला लागू नये म्हणून परशुराम तेथून दूर गेला. सहा दिवसांनी आई व वडिलांचे क्रियाकर्म करण्यासाठी माहूर येथे आला. प्रत्यक्ष भगवान दत्तात्रय यांच्या हस्ते श्राद्धविधी पार पडला. माहूरगडावरील प्राचीन मंदिरात रेणुका अर्थात एकवीरा देवी यांची मूर्ती आहे. देवींती स्मृती म्हणून परशुरामाने ही मूर्ती स्थापन केलेली आहे.

असे म्हणतात, की जमदग्नी ऋषींच्या सांगण्यावरून आई रेणुका देवींचे मस्तक त्यांचा मुलगा परशुराम याने छाटले होते. याबाबत माहूर संस्थानचे पुजारी सांगतात, की आई रेणुका दररोज जवळच्या नदीतून कळशीत पाणी आणत असत. त्यानंतर जमदग्नी ऋषी या पाण्यात स्नान करून भगवान शंकर यांची पूजा करायचे. पण एके दिवशी पाणी आणण्यास उशीर झाला. जेव्हा सूर्यास्तापर्यंत पाणी आले नाही तेव्हा ऋषी जमदग्नींना समजले, की त्यांचे ब्राह्मणत्व संपले आहे. म्हणूनच त्यांनी आपला पुत्र परशुराम यास आपल्या आईचा शिरच्छेद करण्याचा आदेश दिला.

परशुरामांनी आज्ञा पाळली. हे पाहून ते समाधानी झाले आणि त्यांनी परशुरामाला वरदान मागायला सांगितले. तेव्हा मुलाने आई रेणुका देवींना पुन्हा जीवंत करण्यासाठी वरदान मागितले. जमदग्नी ऋषींनी याला निसर्गाच्या विरुद्ध म्हटले आणि २१ दिवसांत आई रेणुका देवी प्रकट होतील, असे सांगितले. देवींच्या दर्शनामुळे प्रत्येक नवस पूर्ण होतो.

पाण्याची गरज असताना परशुरामाने बाण मारून मातृतीर्थ कुंड बांधले. १३ दिवसांनी आई-वडिलांचे सर्व विधी पूर्ण करून परशुराम त्यांच्या वियोगावर खूप रडला. यावेळी आई रेणुका त्यांच्यासमोर हजर झाल्या. परशुराम झुला मंदिरात परशुराम झुला देखील आहे. निपुत्रिक जोडप्यांना मूल व्हावे, अशी इच्छा असते आणि इच्छा पूर्ण झाल्यानंतर एक छोटा झुला आणून मंदिरात अर्पण केला जातो. त्याला परशुराम झुला म्हणतात. या ठिकाणी अनेक झुले दिसतात. जमदग्नी ऋषी हे भगवान शंकर यांचे महान भक्त होते. तो स्वतःच्या मंदिरात पूजा, जप आणि तपश्चर्या करत असे. या मंदिरात शिवलिंग, नागराज, नंदी आदींच्याही मूर्ती आहेत.

माहूरगडावर रामगड किल्ला आहे. हा समुद्रसपाटीपासून २६ फूट उंचीवर असून, या किल्ल्याचे बांधकाम अत्यंत जुने आहे. या किल्ल्याला गिरीदुर्ग असेही म्हणतात. हा किल्ला यादवकालीन आहे. याला दोन तट आहेत. एक तट राष्ट्रकूट घराण्यातील राजाने बांधला, तर दुसऱ्या तट यादव कुळातील राजा रामदेवराय यांनी बांधला. हा किल्ला काही दिवस गौड राजांच्या अधिपत्याखाली होता. यामुळे याला गौड किल्ला म्हणून देखील ओळखले जाते.

स्कंदपुराणात परशुरामाला रेणुका देवींनी दर्शन दिल्यानंतर धर्मराज आणि मार्कंडेय ऋषी यांच्यातील संभाषणही नोंदविलेले आहे. रेणुका देवींच्या मंदिरासमोर रामगड किल्ला असून, त्यावर महाकालीचे मंदिर आहे. माहूर संस्थानचे विश्वस्त व पुजारी सप्तमीला या देवीला अष्टमीला होम-हवन करून आमंत्रण देण्यासाठी जातात. येथे भगवान परशुरामाचे मंदिर देखील आहे. येथे येणाऱ्या भाविकांना प्रसाद म्हणून तांबूल (ज्याला मसाला पान म्हणतात) देखील दिले जाते.

### माहूरगड येथे कसे जाल?

- माहूर हे नांदेडपर्यंत लोहमार्गाने मध्य रेल्वेवर येते. मुंबई, पुणे, हैदराबाद, संभाजीनगर, तसेच बेंगळुरू येथून नांदेडला रेल्वेद्वारे थेट जाऊ शकतो.
- माहूरपर्यंत नांदेड ते माहूर अशी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बससेवा चालते. हा सुमारे तीन तासांचा प्रवास आहे.
- माहूर गावापासून टेकडी मंदिरापर्यंत जाण्यासाठी शहरातून महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बस तसेच काही खासगी वाहने देखील मिळतात.
- नागपूर ते माहूर (वर्धा-यवतमाळ मार्गे) रस्त्याने सुमारे २२० किलोमीटर आहे. या प्रवासासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बस व काही अत्यल्प खासगी वाहनेही मिळतात.
- माहूरला राहण्याची उत्तम सोय असून, येथे भक्तवात्सल्य आश्रम आहेत.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)